| MHPU170007242023 | दाखल दिनांक | २१/०३/२०२३ | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | २१/०३/२०२३ | | |
| | निकाली दिनांक | २३/०७/२०२६ | | |
| | कालावधी | **व.** | **म.** | **दि.** |
| | | **०३** | **०४** | **०२** |

**न्यायदंडाधिकारी वर्ग -१, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्री.अतुल भि. पाटील )**

(दि.२३ जुलै, २०२६ रोजी पारीत)

**नियमित फौजदारी खटला क्र.१११/२०२३**

**(निशाणी क्र.४१)**

(वालचंदनगर पोलीस स्टेशन गु. र. नं.५/२०२३ कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ अन्वये )

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | – | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस निरीक्षक, वालचंदनगर पोलीस ठाणे,<br>वालचंदनगर, ता.इंदापूर, जि.पुणे. |
| अभियोगपक्षातर्फे | – | श्री.एस.एस.भांडारकर, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| तक्रारदार | – | **नंदा मोहन भिसे ,**<br>वय–६० वर्ष, धंदा– घरकाम,<br>रा.बेलवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे. |
| आरोपी | – | **१. सिताबाई दिलीप साळवे ,**<br>वय –५३ वर्ष, धंदा –मजुरी,<br><br>**२. दिलीप साहेबराव साळवे ,**<br>वय –५८ वर्ष, धंदा –मजुरी,<br><br>**३. सौरभ दिलीप साळवे ,**<br>वय –२५ वर्ष, धंदा –मजुरी,<br><br>अ.क्र.१ ते ३, रा.एकेरीवाडी, ता.दौंड, जि.पुणे. |

| | | |
|---|---|---|
| | | **४. नितीन पोपट भिसे ,**<br>वय –४१ वर्ष, धंदा – मजुरी,<br><br>**५. रूपाली नितीन भिसे ,**<br>वय –२८ वर्ष, धंदा –मजुरी,<br><br>अ.क्र.४ व ५ रा.बेलवाडी,<br>ता.इंदापूर, जि.पुणे. |
| आरोपींतर्फे | – | श्री.एस.डी.चौधरी, विधीज्ञ. |
| गुन्हा घडल्याची तारीख | – | दि.०३/०१/२०२३ |
| प्रथम खबरची तारीख | – | दि.०३/०१/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | – | दि.२१/०३/२०२३ |
| दोषारोपाचा तपशील ठेवल्याची तारीख | – | दि.१४/०७/२०२६ |
| पुरावा आरंभ केल्याची तारीख | – | दि.२०/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | – | – |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | – | दि.२३/०७/२०२६ |
| शिक्षा असल्यास, आदेशाचा दिनांक | – | नाही. |

## (आरोपीचा तपशिल)

| अ.क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा दिली किंवा निर्दोष सोडले | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षेदरम्यान तुरुंगात असल्यास तो कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सिताबाई दिलीप साळवे | दि.३०/०१/२०२३ | दि.३०/०१/२०२३ | भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष सोडले | नाही. | नाही. |
| २. | दिलीप साहेबराव साळवे | दि.३०/०१/२०२३ | दि.३०/०१/२०२३ | | निर्दोष सोडले | नाही. | नाही. |
| ३. | सौरभ दिलीप साळवे | दि.३०/०१/२०२३ | दि.३०/०१/२०२३ | | निर्दोष सोडले | नाही. | नाही. |
| ४. | नितीन पोपट | दि.३०/०१/२०२३ | दि.३०/०१/२०२३ | | निर्दोष | नाही. | नाही. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | भिसे | | | | सोडले | | |
| ५. | रूपाली नितीन भिसे | दि.३०/०१/२०२३ | दि.३०/०१/२०२३ | | निर्दोष सोडले | नाही. | नाही. |

**(अभियोग पक्षाचे साक्षीदारांची यादी)**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराची भुमीका |
|---|---|---|
| **सा.क्र.१** | नंदा मोहन भिसे | फिर्यादी |
| **सा.क्र.२** | मोहन बाबुराव भिसे | साक्षीदार |
| **सा.क्र.३** | सचिन मोहन भिसे | साक्षीदार |
| **सा.क्र.४** | पुष्पा चंद्रकांत भिसे | साक्षीदार |
| **सा.क्र.५** | अक्षय चंद्रकांत भिसे | साक्षीदार |

**( अभियोगपक्षाचे निशाणी )**

| अ.क्र. | निशाणी नं. | तपशील |
|---|---|---|
| १. | ३४ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ३५ व ३९ | केस पेपर |

**( आरोपी पक्षाचे निशाणी )**

| अ.क्र. | निशाणी नं. | तपशील |
|---|---|---|
| १. | – | – |

**( अभियोगपक्षाचे वस्तु )**

| अ.क्र. | वस्तु नं. | तपशील |
|---|---|---|
| १. | – | – |

## न्या य नि र्ण य

( दि.२३ जुलै, २०२६ रोजी पारीत )

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ अन्वये दोषारोप ठेवुन खटला चालविण्यात आला.

**<u>अभियोग पक्षाच्या खटल्याची हकिकत थोडक्यात पुढीलप्रमाणे –</u>**

२. फिर्यादी नंदा मोहन भिसे यांनी फिर्याद दिली की, दि.०३/०१/२०२३ रोजी १२.०० वाजताचे सुमारास फिर्यादी तसेच फिर्यादीचे पती मोहन व मुलगा सचिन असे घरी असताना सिताबाई साळवे, दिलीप साळवे, सौरभ साळवे, नितीन भिसे, रूपाली भिसे हे फिर्यादीचे घरासमोर आले व नणंद सिताबाई साळवे या फिर्यादी यांना म्हणाल्या की, माझ्या आईची जमीन तुम्ही कोणाला विचारून वहिवाटत आहात, ही जमीन माझ्या आईची आहे असे म्हणुन फिर्यादीला तसेच फिर्यादीचे पती मोहन व मुलगा सचिन यांना शिवीगाळ करू लागली. त्यावेळी सौरभ साळवे व दिलीप साळवे यांनीही शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. तसेच नितीन भिसे व रूपाली भिसे यांनी फिर्यादीला व फिर्यादीचे पती मोहन यांना हाताने मारहाण करण्यास सुरूवात केली. त्यावेळी भांडणाचा आवाज ऐकुन शेजारी असणारा फिर्यादीचा पुतण्या अक्षय व जाऊ पुष्पा हे तेथे भांडणे सोडविण्यासाठी आले असता त्यांनाही आरोपींनी शिवीगाळ केली. तसेच सौरभ साळवे याने पडलेली काठी हातात घेवुन फिर्यादीचा पुतण्या अक्षय याचे पाठीवर काठीने मारले. तसेच फिर्यादीची जाऊ पुष्पा हिचे कमरेवर व पाठीवर काठीने मारले. फिर्यादीचा मुलगा सचिन याचे पाठीवर काठीने मारहाण केली. तसेच फिर्यादीचे हातावर व पाठीवर सौरभ याने काठीने मारहाण केली तसेच सर्वांनी हाताने लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच तुम्ही जर जमीनीत पाय ठेवला तर तुम्हाला जिवंत ठेवणार नाही असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर सोडवासोडव केली व पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यासाठी गेले. पोलीसांनी दवाखान्याची यादी दिली. त्यानंतर लासुर्णे येथील सरकारी दवाखान्यात उपचार घेवुन पोलीस स्टेशन येथे येवून आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीवरुन गु.र.नं.५/२०२३ चा नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास सहाय्यक फौजदार आर. आर. चौधर यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा केला, मुद्देमाल जप्ती पंचनामा करून पावती फाडली, जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले, आरोपींना समजपत्र दिले. आरोपींविरुध्द पुरेसा

पुरावा मिळून आल्याने त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र पाठविले.

४. आरोपीं न्यायालयात हजर झाल्यानंतर नि.क्र.२० वर आरोपींविरुध्द दोषारोप ठेवला. तो आरोपींना वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबूल केल्याने खटल्याची पुढील संपरिक्षा करण्यात आली.

५. आरोपींविरुध्द परिस्थितीविशेष खुलासा करणेइतपत पुरावा अभिलेखावर न आल्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१(१)(ब) अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. आरोपींविरुध्दचा दोषारोप, अभियोगपक्षाच्या साक्षीदाराचा पुरावा इत्यादीचा विचार करीता खालील मुद्दे खटल्याच्या विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष कारणमिमासेसहित खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| *अ. क्र.* | *मुद्दे* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, दि.०३/०१/२०२३ रोजी १२.०० वाजताचे सुमारास मौजे बेलवाडी गावचे हद्दीत फिर्यादीचे राहते घरासमोर, बेलवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे येथे आरोपींनी समान उद्दिष्ट साद्य करण्याच्या हेतूने बेकायदेशीर जमाव करून त्या जमावाचे सदस्य झालात ? | *नाही.* |
| २. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्दिष्ट साद्य करण्याच्या हेतूने दंगा केला ? | *नाही.* |
| ३. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.३ यांनी समान उद्दिष्ट साद्य करण्याच्या हेतूने प्राणघातक हत्यार काठी सारखे हत्यार यांनी सज्ज होऊन दंगा केला ? | *नाही.* |
| ४. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व | *नाही.* |

| | | |
|---|---|---|
| | ठिकाणी आरोपी क्र.३ याने समान उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने काठीने फिर्यादीस हातावर व पाठीवर, फिर्यादीचा मुलगा सचिनचे पाठीवर, फिर्यादीचा पुतण्या अक्षय यांच्या पाठीवर व फिर्यादीची जावु पुष्पा हिचे कमरेवर व पाठीवर मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली ? | |
| ५. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.४ व ५ यांनी समान उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने फिर्यादी व साक्षीदार यांना हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केली ? | ***नाही.*** |
| ६. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करून शांतताभंग होईल असे कृत्य केले ? | ***नाही.*** |
| ७. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने फिर्यादी व साक्षीदार यांना तुम्ही जर जमिनीत पाय ठेवला तर तुम्हाला जिवंत ठेवणार नाही असे म्हणून जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | ***नाही.*** |
| ८. | आदेश काय ? | ***आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.*** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ८ करिता**

वरील मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने ते एकत्रीत विचाराधीन घेतलेले आहेत.

**७.** प्रस्तुत प्रकरणात आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता विधान कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे दोषारोप निश्चीत

केलेले आहेत. त्यामुळे अभियोगपक्षाने आरोपींनी गुन्हा करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव करून दंगा केला. तसेच बलप्रयोग केला व प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी व साक्षीदार यांना काठी या सारख्या हत्याराने मारहाण करून इच्छापूर्वक दुखापती केले, साक्षीदारास मारहाण केली तसेच शिवीगाळ दमदाटी करून शांतताभंग होईल असे कृत्य केले व जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? या बाबी संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द करणे आवश्यक आहे.

८. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सा.क्र.१ नंदा मोहन भिसे हिची साक्ष नि.क्र.२८ वर नोंदविली. सदर साक्षीदार हिने तिच्या सरतपासात दि.०३/०१/२०२३ रोजी काय घटना घडल्याचे आठवत नाही असे कथन केलेले आहे. तसेच त्याने आरोपींनी संगनमत करून तिला मारहाण केल्याचे स्पष्टपणे नाकारलेले आहे. सदर साक्षीदाराने फिर्यादीतील मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली. त्यामुळे सरकारी वकिलांनी फिर्यादीस उत्तर सुचक प्रश्न विचारून उलटतपास घेतला. परंतू अभियोगपक्षाच्या सुचक प्रश्नांच्या उत्तरादाखल फिर्यादीने सर्व कथने नाकारलेली आहेत. फिर्यादीने आरोपींची व त्यांची न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाली असल्याचे कथन केले. परिणामी फिर्यादीकडून अभियोगपक्षाच्या कथनाला दुजोरा मिळालेला नाही.

९. सा.क्र.२ मोहन बाबुराव भिसे यांची साक्ष नि.क्र.३० वर, सा.क्र.३ संगिता मोहन भिसे यांची साक्ष नि.क्र.३१ वर, सा.क्र.४ पुष्पा चंद्रकांत भिसे यांची साक्ष नि.क्र.३२ वर व सा.क्र.५ अक्षय चंद्रकांत भिसे यांची साक्ष नि.क्र.३३ वर नोंदविली. सदर साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीत दि.०३/०१/२०२३ रोजी काय घडले हे त्यांना माहिती नसल्याचे कथन केलेले आहे. त्यामुळे सरकारी वकिलांनी सदर साक्षीदारांना उत्तरसूचक प्रश्न विचारून उलटतपास घेतला. परंतू उलटतपासात अभियोगपक्षास मदत होईल अशी कोणतीही कबूली सदर साक्षीदारांनी दिलेली नाही. प्रस्तुत प्रकरणात स्वतः फिर्यादी व जखमी साक्षीदार यांनी आरोपींविरुध्द कोणतेही कथन केलेले नाही.

१०. फिर्यादीच्याच तक्रारीवर हे संपूर्ण प्रकरण उभे आहे. परंतु फिर्यादी व जखमी साक्षीदार हे आरोपींच्याविरुध्द काहीही कथन करत नाही. फिर्यादी व आरोपीं यांचेमध्ये

तडजोड झालेबाबतची तडजोड पुरशीस नि.क्र.२७ वर दाखल करण्यात आलेली आहे. प्रस्थापित कायदयाच्या तत्वानुसार अभियोगपक्षाने आरोपींवरील गुन्हा संशयाच्या पलीकडे जावून सिध्द केला पाहिजे. परंतू प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द सबळ व विश्वसनीय पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे आरोपींनी गुन्हा करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव करून दंगा केला. तसेच बलप्रयोग केला व प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी व साक्षीदार यांना काठी या सारख्या हत्याराने मारहाण करून इच्छापूर्वक दुखापती केले, साक्षीदारास मारहाण केली तसेच शिवीगाळ दमदाटी करून शांतताभंग होईल असे कृत्य केले व जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केल्याचे सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपीं निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र.१ ते ७ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतात व मुद्दा क्र.८ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. **आरोपी क्र.१ सिताबाई दिलीप साळवे, आरोपी क्र.२ दिलीप साहेबराव साळवे, आरोपी क्र.३ सौरभ दिलीप साळवे, आरोपी क्र.४ नितीन पोपट भिसे व आरोपी क्र.५ रूपाली नितीन भिसे** यांची भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ अन्वयेच्या शिक्षेस पात्र अपराधातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता क.२७१(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहेत.

३. जप्त मुद्देमाल लाकडी काठी ही अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

४. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता क.४८१(१) अन्वये आरोपींनी प्रत्येकी रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे असे आदेशीत करण्यात येते. सहा महिन्याच्या कालावधीत अपील न झालेस, सदर वैयक्तीक बंधपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PATIL ATUL BHIMRAO
Date: 2026.07.23 15:10:55 +0530

**दिनांक –२३/०७/२०२६** **(ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | उमेश वाय.भगत |
| न्यायालयाचे नाव | श्री. ए. बी. पाटील, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इंदापूर. |
| न्यायनिर्णयाची तारिख | २३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | २३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | २३/०७/२०२६ |